<u>जोडपत्र 2</u>

**महिला एसएचजींसाठी व्याज अर्थसहाय्य योजना – वर्ष 2019-20**

(1) सर्व वाणिज्य बँका (फक्त सार्वजनिक बँका, खाजगी क्षेत्रातील बँका व प्रादेशिक ग्रामीण बँका) आणि 250 जिल्ह्यातील सहकारी बँकांसाठी, महिला एसएचजींना वर्ष 2019-20 मध्ये कर्जावरील व्याज अर्थसहाय्य योजना

(i) सर्व महिला एसएचजीं, रु.3 लाख पर्यंतच्या कर्जावर दरसाल 7% व्याज अर्थसहाय्यासाठी पात्र असतील. विद्यमान आऊट स्टँडिंग कर्जामध्ये, एसजीएसवायखाली भांडवली अर्थसहाय्य मिळविणारे एसएचजी, ह्या योजनेखाली लाभ घेण्यास पात्र नसतील.

(ii) <u>जोडपत्र 3</u> मध्ये दिलेल्या 250 जिल्ह्यां मधील वाणिज्य बँका ग्रामीण भागातील सर्व महिला एसएचजींना 7% दराने कर्ज

(iii) 2019-20 ह्या वर्षासाठी, सर्व वाणिज्य बँकांना (सार्वजनिक क्षेत्र, खाजगी क्षेत्र व लघु वित्त बँका), आकारण्यात आलेला भारित सरासरी दर (डब्ल्यु ए आय सी - वित्तीय सेवा विभाग, वित्त मंत्रालय ह्यांनी विहित केलेला) व 7% ह्यामधील फरकाचे कमाल 5.5% मर्यादेपर्यंत अर्थसहाय्य दिले जाईल.

(iv) ह्याशिवाय कर्जाची त्वरित परत फेड केल्यास एसएचजींना अतिरिक्त 3% अर्थ सहाय्य दिले जाईल. त्वरीत परत फेडींच्या 3% अतिरिक्त अर्थ सहाय्य बाबत, पुढिल निकष पूर्ण केले असल्यासच ते एसएचजी खाते त्वरित परतफेड करणारे समजले जाईल.

अ. कॅश क्रेडिट लिमिट साठी

(i) येणे असलेली रक्कम, मर्यादा/निकासी मर्यादेपेक्षा, सतत 30 दिवसांपेक्षा अधिक कालासाठी थकित राहिलेली असू नये.

(ii) खात्यामध्ये नियमितपणे जमा व डेबिट होत असावे. कोणत्याही परिस्थितीत, एखाद्या महिन्यामध्ये ग्राहकाने किमान एक तरी रक्कम जमा केलेली असावी.

(iii) ग्राहकाने भरलेली रक्कम, त्या महिन्यामध्ये डेबिट केलेल्या व्याजासाठी पुरेशी असावी.

ब. मुदत कर्जांसाठी :- त्या कर्जाच्या मुदतीदरम्यान, व्याजाची सर्व प्रदाने आणि/किंवा मुद्दलाचे हप्ते ठरविलेल्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत भरले गेले होते असे मुदत कर्ज खाते, त्वरित प्रदान करणारे खाते म्हणून समजले जाईल.

(v) ह्या 3% अतिरिक्त अर्थसहाय्याची रक्कम बँकांनी, पात्र असलेल्या एसएचजी खात्यांमध्ये जमा करावी व अहवाल तिमाहीच्या अखेरीनंतर त्याची भरपाई मागावी.

(vi) ही योजना केवळ ग्रामीण क्षेत्रातील महिला बचत गटांपुरतीच मर्यादित आहे.

(vii) ह्या योजनेसाठीचा निधी पुरवठा, डीएवाय- एनआरएलएम खालील केंद्रीय वाटपामधून केला जाईल.

Viii) व्याज अर्थसहाय्य योजनेची अंमलबजावणी, ग्रामीण विकास मंत्रालयाने (एमओआरडी) निवडलेल्या एका नोडल बँकेच्या मार्फत केली जाईल. एमओआरडीने सांगितल्यानुसार, नोडल बँक ही योजना एका वेब आधारित मंचामार्फत कार्यान्वित करील. एमओआरडी ह्या नोडल बँकेला अधिसूचित करील.

(ix) कोअर बँकिंग सोल्युशन्सवर (सीबीएस) काम करणा-या सर्व बँका ह्या योजनेखाली व्याज अर्थसहाय्य मिळवू शकतात.

(x) एसएचजींना 7% दराने नियमित अर्थसहाय्य दिलेल्या कर्जांवरील व्याज अर्थसहाय्य मिळविण्यासाठी, आवश्यक त्या तांत्रिक गुणविशेषानुसार, नोडल बँकेच्या पोर्टलवर, एसएचजी कर्ज खात्यांची माहिती अपलोड करणे आवश्यक आहे. अतिरिक्त 3% अर्थसहाय्याचे दावे सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी बँका आणि लघु वित्त बँका ह्यांनी ह्याच पोर्टलवर सादर करणे आवश्यक आहे. सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी बँका व लघु वित्त बँका ह्यांनी, जून 30, 2019, सप्टेंबर 30, 2019, डिसेंबर 31, 2019 व मार्च 31, 2020 रोजी असल्यानुसार, त्यांचे नियमित दावे (डब्ल्युएआयसी किंवा कर्ज देण्याचा दर व 7% ह्यामधील फरक) व अतिरिक्त दावे (त्वरित परतफेडीवर 3% दराने), तिमाही धर्तीवर, पुढील महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात सादर करणे आवश्यक आहे.

(xi) एसएचजींना 7% दराने दिलेल्या कर्जावरील व्याज अर्थसहाय्य आणि 3% अतिरिक्त अर्थसहाय्य मिळविण्यासाठी, सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी बँका व लघु वित्त बँका ह्यांनी नोडल बँकेकडे तिमाही धर्तीवर दाव्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही बँकेने सादर केलेल्या दाव्यांसोबत, ते अर्थसहाय्याचे दावे खरे व सत्य असल्याबाबतचे दावा प्रमाणपत्र (जोडपत्र 4 व 5) जोडणे आवश्यक आहे. मार्च, 2020 अखेरीस संपणा-या तिमाहीसाठीचे कोणत्याही बँकेचे दावे, त्या बँकेच्या संपूर्ण एफवाय 2019-20 साठीचे वैधानिक ऑडिटरने दिलेले प्रमाणपत्र मिळाल्यानंतरच एमओआरडीकडून तडजोडित केले जातील.

(xii) 2019-20 ह्या वर्षात केलेल्या वाटपाबाबतचे व त्या वर्षात समाविष्ट न केलेले शेष दावे वेगळ्याने एकत्रित केले जावेत व ‘अतिरिक्त दावे’ असे मार्क करुन, सार्वजनिक क्षेत्रातील बँका, खाजगी बँका व लघु वित्त बँकांकडून, त्या दाव्यांच्या खरेपणाबाबत वैधानिक ऑडिटरने ऑडिट केले जाऊन, जून 30, 2020 पर्यंत नोडल बँकेकडे सादर केले जावेत. वित्तीय वर्ष 2019-20 साठीचे, व्याज अर्थसहाय्याबाबतचे कोणत्याही बँकेचे दावे, जून 30, 2020 नंतर स्वीकारले जाणार नाहीत.

(xiii) बँकांनी केलेल्या दाव्यांमधील दुरुस्त्या, ऑडिटरच्या प्रमाणपत्रावर आधारित. खाजगी क्षेत्रातील बँका, सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि लघु वित्त बँकांसाठी, त्यानुसार, नोडल बँकेच्या पोर्टलवर दुरुस्त्या केल्या जाव्यात.

**(2) वर्ग 2 जिल्ह्यांसाठी व्याज अर्थसहाय्य योजना (250 जिल्हे सोडून इतर जिल्हे)**

वरील 250 जिल्हे सोडून इतर वर्ग 2 जिल्ह्यांसाठी, डीएवाय-एनआरएलएमखालील सर्व महिला एसएचजी, 7% व्याजदराने कर्जसुविधा मिळविण्यासाठी, व्याज अर्थसहाय्य मिळविण्यास पात्र असतील. ह्या अर्थसहाय्यासाठीचा निधी, राज्य ग्रामीण उपजीविका अभियानांना (एस.आर.एल.एम.) डीएवाय - एनआरएलएम साठीच्या वाटपामधून उपलब्ध केला जाईल. वर्ग 2 जिल्ह्यांमध्ये, बँका, त्यांच्या नेहमीच्या कर्ज देण्याच्या नॉर्म्सनुसार एसएचजींना आकार लावतील आणि कर्ज देण्याचे दर आणि 7% ह्यामधील कमाल 5.5% पर्यंतचा फरक, वर्ष 2019-20 साठी एसआरएलएमकडून, एसएचजींच्या कर्ज खात्यामध्ये जमा केला जाईल. वरील योजनेनुसार, वर्ष 2019-20 साठी वर्ग 2 जिल्ह्यांसाठी, व्याज अर्थसहाय्याबाबतची कार्यकारी मार्गदर्शक तत्वे व गुणविशेष पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) **<u>बँकांची भूमिका</u>**

कोअर बँकिंग सोल्युशन (सीबीएस) कार्यान्वित असलेल्या सर्व बँकांनी, कर्ज वाटप व आऊटस्टँडिंग कर्ज बाबतचा तपशील, एमओआरडीने सूचित केलेल्या नमुन्यात, थेट सीबीएस मंचावरुन, ग्रामीण विकास मंत्रालयाकडे (एफटीपी किंवा इंटरफेस मार्फत) व एसआरएलएमकडे पाठविणे आवश्यक आहे. एसएचजींना द्यावयाच्या व्याज अर्थसहाय्याचे गणन व वाटप करण्यास सहाय्य होण्यासाठी, ही माहिती मासिक धर्तीवर देण्यात यावी.

(ब) **<u>राज्य सरकारांची भूमिका</u>**

(i) डीएवाय - एनआरएलएमखाली, ग्रामीण क्षेत्रातील सर्व महिला एसएचजी, रु.3 लाखांपर्यंतच्या कर्जावर, त्वरित परतफेडीसाठीच्या दरसाल 7% दराने व्याज अर्थसहाय्यासाठी पात्र असतील.

(ii) ह्या योजनेची अंमलबजावणी, राज्य ग्रामीण उपजीविका अभियानांकडून (एसआरएलएम) केली जाईल. वाणिज्य व सहकारी बँकांकडून कर्ज मिळविलेल्या एसजीएसवाय खाली व पात्र असलेल्या एसएचजींना, हे एसआरएलएम, व्याज अर्थसहाय्य उपलब्ध करुन देतील. ह्या अर्थसहाय्यासाठीचा निधी, केंद्रीय वाटप; राज्याचे योगदान भारत सरकारच्या नॉर्म्सनुसार दिला जाईल.

(iii) वर्ष 2019-20 साठी ह्या एसएचजींना, बँकांचा कर्ज देण्याचा दर, व 7% ह्यामधील फरक - कमाल 5.5% मर्यादेपर्यंत, एसआरएलएम कडून मासिक/तिमाही धर्तीवर थेट अर्थसहाय्याने दिला जाईल. त्वरित परतफेड करणा-या एसएचजींच्या कर्जखात्यात, अर्थसहाय्याची रक्कम, एसआरएलएमकडून ई-ट्रास्फरने जमा केली जाईल. ते कर्ज खाते आधीच बंद झाले असल्यास किंवा त्या कर्ज खात्यात ई-ट्रान्स्फर कोणत्याही कारणाने यशस्वी न झाल्यास, अर्थसहाय्याची रक्कम संबंधित एसएचजीच्या संबंधित बचत खात्यात जमा केली जावी.

(iv) व्याज अर्थसहाय्याबाबत, पुढील अटी पूर्ण केल्या असल्यासच ते खाते त्वरित परतफेड खाते समजले जाईल.

(अ) कॅश क्रेडिट लिमिटसाठी :

(i) येणे असलेली रक्कम, मर्यादा/निकासी मर्यादेपेक्षा, सतत 30 दिवसांपेक्षा अधिक कालासाठी थकित राहिलेली असू नये.

(ii) खात्यामध्ये नियमितपणे जमा व डेबिट होत असावे. कोणत्याही परिस्थितीत, एखाद्या महिन्यामध्ये ग्राहकाने किमान एक तरी रक्कम जमा केलेली असावी.

(iii) ग्राहकाने भरलेली रक्कम, त्या महिन्यामध्ये डेबिट केलेल्या व्याजासाठी पुरेशी असावी.

ब. मुदत कर्जासाठी :- त्या कर्जाच्या मुदतीदरम्यान, व्याजाची सर्व प्रदाने आणि/किंवा मुद्दलाचे हप्ते ठरविलेल्या तारखेपासून 30 दिवसांच्या आत भरले गेले होते असे मुदत कर्ज खाते, त्वरित प्रदान करणारे खाते म्हणून समजले जाईल.

(iv) विद्यमान कर्जामध्ये एसजीएसवाय खाली राज्य कॅपिटल सबसिडी घेतली असलेले महिला एसएचजी, ह्या योजनेखाली घेतलेल्या कर्जावर, व्याज अर्थसहाय्य मिळविण्यास पात्र असणार नाहीत.

(v) एसआरएलएमनी, पात्र असलेल्या एसएचजींच्या कर्जखात्यांमध्ये हस्तांतरित केलेल्या अर्थसहाय्याच्या रकमा दर्शविणारे तिमाही उपयोजन प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

**III.** विशिष्ट अशा व्याज अर्थसहाय्य योजना असलेल्या राज्यांना सांगण्यात येत आहे की, त्यांनी त्यांच्या मार्गदर्शक तत्वांचा मेळ ह्या केंद्रीय योजनेशी घालावा.